शासकिय जमीनीवरील अतिक्रमण प्रतिबंध,
निष्कासित करणे, फिर्याद दाखल करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन परिपत्रक क्रमांकः जमीन- ०७/२०१३/प्र.क्र.३७४/ज-१**

जागतिक व्यापार केंद्र, सेंटर वन इमारत, ३२ वा मजला,
कफ परेड,मुंबई-४०० ००५
दिनांक: १० ऑक्टोबर, २०१३

**वाचा - शासन परिपत्रक क्रमांकः जमीन- ०३/२००९/प्र.क्र.१३/ज-१, दिनांक ७ सप्टेंबर, २०१०.**

**प्रस्तावना**

शासकिय जमीनीवरील अतिक्रमणास प्रतिबंध करणे व झालेली अतिक्रमणे तात्काळ निष्कासित करण्याबाबत वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. मात्र अद्यापही क्षेत्रिय स्तरावर त्यानुषंगाने गांभीर्यपूर्वक कार्यवाही होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. काही प्रसंगी अतिक्रमणास शासकिय जमीनीच्या लगतच्या व्यक्ती/स्थानिक लोकांकडून विरोध होतो. अशावेळेस अतिक्रमणास स्थानिक लोकांनी विरोध केल्यास कायदा व सुव्यवस्थेची स्थिती बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र जमीनीच्या मालकी हक्काच्या अनुषंगाने सरकारी यंत्रणेकडून फिर्याद न दाखल केल्यामूळे पोलीसांना परिणामकारक कार्यवाही करता येत नाही, असे गृह विभागाने निदर्शनास आणले होते. त्यानुसार या विभागाने दिनांक ७ सप्टेंबर, २०१० च्या शासन परिपत्रकान्वये सर्व क्षेत्रिय अधिका-यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. शासनाने दिनांक ७ सप्टेंबर, २०१० च्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांच्या अनुषंगाने क्षत्रिय कार्यालयाकडून गांभीयपूर्वक कार्यवाही होत नसल्याने लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने पुन्हा क्षेत्रिय स्तरावरील अधिका-यांना सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

**शासन परिपत्रक**

उपरोक्त पार्श्वभूमी आधारे क्षेत्रिय स्तरावरुन सत्वर कारवाई होण्यासाठी दिनांक ७ सप्टेंबर, २०१० च्या शासन परिपत्रकाकडे क्षेत्रिय अधिका-यांचे लक्ष या आदेशाद्वारे वेधण्यात येत आहे. तसेच त्यानुषंगाने या आदेशाद्वारे पुनश्च खालीलप्रमाणे आदेश/सूचना देण्यात येत आहे.

(१) ग्रामीण /नागरी भागातील शासकिय, पड, गायरान जमीनीची तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ताब्यात असलेल्या मोकळया/सार्वजनिक जागांची नकाशासह सूची तयार करुन ती स्थानिक महसूल कार्यालयात, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयात ठळकपणे लावण्यात

यावी. त्यासोबत शासकिय जमीनीवर अतिक्रमण केल्यास कायदेशिर कारवाईचा इशारा देण्यात यावा.

(२) शासकिय, पड, गायरान जमीनीवर किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वजनिक, मोकळया जागेवर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर अतिक्रमण तात्काळ निष्कासित करण्याची कार्यवाही करावी.

(३) शासकिय जमीनीवरील अतिक्रमणास प्रतिबंध करणे ही सदर जमीन ज्या विभागाच्या ताब्यात आहे त्या विभागाची जबाबदारी आहे. त्यामुळे शासकिय जमीनीच्या बाबतीत संबंधित तलाठी/मंडळ अधिकारी, वन जमीनीच्या बाबतीत स्थानिक वन अधिकारी, गायरान व सार्वजनिक जमीनीच्या बाबतीत संबंधित ग्रामसेवक, नगरपालिकेचे मुख्याधिकारी आणि अन्य प्रकरणात शासकियजमीन ज्या विभागाच्या ताब्यात आहे त्या विभागाच्या/संस्थेचा स्थानिक अधिकारी यांनी तात्काळ पोलीसात फिर्याद देण्याची दक्षता घ्यावी. फिर्याद दाखल करण्याची जबाबदारी एकमेकावर ढकल्यास वरिष्ठांनी संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावी.

(४) सर्व जिल्हातील अतिक्रमणाबाबत प्रतिबंध, निष्कासित करणे, फिर्याद दाखल करणेबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांनी सत्वर समन्वय साधून सदर आदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१०१०१६४७४२०२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil Shridharrao Kothekar

Digitally signed by Sunil Shridharrao Kothekar
DN: CN = Sunil Shridharrao Kothekar, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FOREST
Date: 2013.10.10 17:33:50 +05'30'

**सुनिल कोठेकर**
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत,

१) सर्व विभागीय आयुक्त,
२) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) सर्व जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी
४) सर्व तहसिलदार
५) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य,(१) मुंबई.